# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

E-mail - smcgados2@gmail.com

जा.क्र/सआस/दस्तऐवज तपासणी/आस्था-२/८७ दि. ०४ /०३/ २०२५ E- 232452

संदर्भः- १. जा.क्र.नआ/वै/सरळसेवा पदभरती जाहीरात/३४०, दि. ०९/११/२०२३
२. जा.क्र.नआ/वै/सरळसेवा पदभरती जाहीरात/३८५, दि. १५/१२/२०२३
३. जा.क्र.नआ/वै/२७ पोस्ट/गुण प्रसिध्दी/५७१, दि.२८/०३/२०२४ चे प्रसिध्दीपत्रक

### -: प्रसिध्दीपत्रक :-

सोलापूर महानगरपालिकेकडून उपरोक्त संदर्भ क्र.1 व 2 ने जाहीरात प्रसिध्द करून वर्ग-अ (अराजपत्रित) ते वर्ग-ड मधील आस्थापनेवरील 31 विविध संवर्गामधून एकूण 302 पदे भरण्याबाबतची पदभरती जाहीरात प्रसिध्द. करण्यात आलेली होती. उपरोक्त पदभरती जाहीरातीमध्ये नमूद पदाच्या ऑनलाईन परीक्षा दि.15/02/2024 ते दि.17/02/2024 या कालावधीत TCS iON यांच्याकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रमानुसार 31 संवर्गापैकी २७ संवर्गाची गुणयादी सोलापूर महानगरपालिकेचे www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून उमेदवाराची अंतिम निवडी करीता दस्तऐवज पडताळणी, वैद्यकिय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणीचे अधीन राहून शिफारस करण्यात आली आहे.

तथापी फिल्टर इन्स्पेक्टर, गट-क तत्कालीन वेळी केवळ निवडीत उमेदवारांची दस्तऐवज पडताळणीकरीता बोलविण्यात आलेले होते. आज रोजी फिल्टर इन्स्पेक्टर, गट-क या संवर्गातील (VJ - A) प्रवर्गातील कर्मचारी यांनी राजीनामा दिलेला असल्याने सदरचे पद रिक्त झालेला आहे. सबब, गुणानुक्रमे जेष्ठतेनुसार खालील उमेदवारांस दस्तऐवज पडताळणीकरीता बोलविण्यात येत आहे.

**फिल्टर इन्स्पेक्टर, गट-क,**

| Roll No | Candidate Full Name | Date of Birth | Reservation caste category | Marks Obtained | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| 24172079980000001 | SUNIL WAMAN PAWAR | 23/Apr/1991 | De-Notified Tribe A (VJ - A) | 130 | WL-VJ-A-GEN |

वर नमूद संवर्गाची निवडसूची तयार करण्यासाठी वर यादीत नमूद उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे की, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र/वैधताप्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र व इतर सर्व दस्ताऐवज यांची मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतिसह स्वतः (प्रतिनिधी/पाहुणे/भाऊ चालणार नाही) दस्तऐवज पडताळणीकरीता खाली नमूद ठिकाणी व वेळी उपस्थित राहावे.

| दिनांक, वेळ व स्थळ |
|---|
| दिनांक.०५ /०३/२०२५ वेळ :- सकाळी ११:०० ते सांय. ०४:०० <br> स्थळ :- सामान्य प्रशासन विभाग, आस्था-४, सो.म.पा. |

दस्ताऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा, स्वतःचे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठार्थ आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहित धरून निवड रद्द केली जाईल व तदनंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

दस्तऐवज पडताणीकरीता उमेदवाराने स्वः खर्चाने उपस्थित रहावायाचे आहे. दस्तऐवज प्रक्रियेबाबत मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहिल व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

मा.आयुक्त तथा अध्यक्ष,
निवड समिती यांच्या आदेशान्वये

(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उप-आयुक्त
सोलापूर महानगरपालिका